# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** केद्रं पुरस्कृत शासनाचे अमृत-२.० योजनेअंतर्गत " पोहरा नदी
**{प्रमुख लेखा व वित्त विभाग}** प्रदुषण निर्मुलन प्रकल्प " अंतर्गत नागपूर शहरातील साऊथ सिवरेज झोन व हुडकेश्वर आणि नरसाळा करीता सांडपाणी संकलन प्रणालीचा विकास करणे व प्रक्रिया बाबतच्या प्रकल्पा करीता मनपाचे हिस्याचे निधीची तरतूद करण्याकरीता कर्ज घेण्याबाबत.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने, शासन निर्णय नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन दिनांक ०९/११/२०२३ नुसार अमृत-२.० योजनेअंतर्गत नागपूर मनपाच्या मलनि:स्सारण प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून एकूण प्रकल्प खर्च रू. ९५७.०१ कोटी आहे. यात म.न.पा. हिस्सा ५० % प्रमाणे रू. ४७८.५१ कोटी आहे. सदर शा.नि.च्या ४.९ नुसार स्वहिस्याचा निधी उभारतांना १५ व्या वित्त आयोगातून मनपास प्राप्त होणा-या निधीचा वापर करता येईल, त्यानुसार विभागाने रू. ४८.३९ कोटी इतका निधी चिन्हांकित केलेला असुन रू. ४५० कोटी निधी उपलब्ध करून देण्याबाबत सुचीत केलेले आहे.

तथापि, सन २०२४-२०२५ मध्ये सदर प्रकल्पासाठी मनपा निधीतून सुमारे रू. ५० कोटी खर्च करण्यात आलेला असल्याने रू. ४०० कोटी इतका मनपा हिस्सा उभारणे आवश्यक आहे.

सध्यस्थितीत मनपाला बांधील खर्च जसे वेतन, सेवानिवृत्ती वेतन, विद्युत खर्च, कच्चे पाणी खरेदी, पेट्रोल, डिझेल, सुरक्षा व्यवस्था, कर्ज परत फेड, कचरा उचल खर्च, शासकीय देणी, परिवहन विभागाला अनुदान, वाहने भाडे तत्वावर घेणे, लाईटिंग मेन्टनन्स आदी बाबींवर रू. १४५.०० कोटी इतका मासीक खर्च करावा लागत असून निश्चित स्वरूपाचे उत्पन्न ( GST अनुदान) रू. १४८.०० कोटी आहे. तसेच इतर उत्पन्न जसे की मालमत्ता कर, नगररचना विभागाकडील उत्पन्न यातुन मनपाच्या इतर विकास कामांवरील खर्च भागविला जातो. त्यामुळे उपरोक्त रू. ४०० कोटी मनपा हिस्सा मनपा स्वउत्पन्नातुन उभारणे शक्य नसल्यामुळे बँकामार्फत कर्ज घेणे आवश्यक आहे.

यासाठी मा. आयुक्त यांची मंजुरी प्राप्त असून सदर प्रस्ताव आर्थिक बाबींशी संबधीत असल्यामुळे स्थायी समिती व स्थायी समितीच्या मंजूरीनंतर मनपा महासभेची मंजुरी प्राप्त करावी लागेल व त्यानंतर महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ च्या कलम १०९ अंतर्गत तरतुदीनुसार राज्य शासनाची मंजूरी घ्यावी लागेल तरी प्रस्तुत विषय मान्यतेकरीता सादर.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 18/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 13/06/2025**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार प्रमुख लेखा व वित्त अधिकारी, लेखा व वित्त विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार केद्रं पुरस्कृत शासनाचे अमृत-२.० योजनेअंतर्गत " पोहरा नदी प्रदुषण निर्मुलन प्रकल्प " अंतर्गत नागपूर शहरातील साऊथ सिवरेज झोन व हुडकेश्वर आणि

नरसाळा करीता सांडपाणी संकलन प्रणालीचा विकास करणे व प्रक्रिया बाबतच्या प्रकल्पा करीता मनपाचे हिस्याचे निधीची तरतूद करण्याकरीता कर्ज घेण्याबाबत.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने, शासन निर्णय नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन दिनांक ०९/११/२०२३ नुसार अमृत-२.० योजनेअंतर्गत नागपूर मनपाच्या मलनि:स्सारण प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून एकूण प्रकल्प खर्च रू. ९५७.०१ कोटी आहे. यात म.न.पा. हिस्सा ५० % प्रमाणे रू. ४७८.५१ कोटी आहे. सदर शा.नि.च्या ४.९ नुसार स्वहिस्याचा निधी उभारतांना १५ व्या वित्त आयोगातून मनपास प्राप्त होणा-या निधीचा वापर करता येईल, त्यानुसार विभागाने रू. ४८.३९ कोटी इतका निधी चिन्हांकित केलेला असुन रू. ४५० कोटी निधी उपलब्ध करून देण्याबाबत सुचीत केलेले आहे.

तथापि, सन २०२४-२०२५ मध्ये सदर प्रकल्पासाठी मनपा निधीतून सुमारे रू. ५० कोटी खर्च करण्यात आलेला असल्याने रू. ४०० कोटी इतका मनपा हिस्सा उभारणे आवश्यक आहे.

सध्यस्थितीत मनपाला बांधील खर्च जसे वेतन, सेवानिवृत्ती वेतन, विद्युत खर्च, कच्चे पाणी खरेदी, पेट्रोल, डिझेल, सुरक्षा व्यवस्था, कर्ज परत फेड, कचरा उचल खर्च, शासकीय देणी, परिवहन विभागाला अनुदान, वाहने भाडे तत्वावर घेणे, लाईटिंग मेन्टनन्स आदी बाबींवर रू. १४५.०० कोटी इतका मासीक खर्च करावा लागत असून निश्चित स्वरूपाचे उत्पन्न ( GST अनुदान) रू. १४८.०० कोटी आहे. तसेच इतर उत्पन्न जसे की मालमत्ता कर, नगररचना विभागाकडील उत्पन्न यातुन मनपाच्या इतर विकास कामांवरील खर्च भागविला जातो. त्यामुळे उपरोक्त रू. ४०० कोटी मनपा हिस्सा मनपा स्वउत्पन्नातुन उभारणे शक्य नसल्यामुळे बँकामार्फत कर्ज घेणे आवश्यक आहे.

यासाठी मा. आयुक्त यांची मंजुरी प्राप्त असून सदर प्रस्ताव आर्थिक बाबींशी संबधीत असल्यामुळे स्थायी समिती व स्थायी समितीच्या मंजूरीनंतर मनपा महासभेची मंजुरी प्राप्त करावी लागेल व त्यानंतर महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ च्या कलम १०९ अंतर्गत तरतुदीनुसार राज्य शासनाची मंजूरी घेण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.